ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 51.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाविलास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १९ सप्टेंबर, १९५१ अंक ३८

## विविध माहिती

**संयुक्त प्रांतांत वेधशाळा**—बनारस येथील संस्कृत कॉलेजांत वेधशाळा उभारण्याचें उत्तर प्रदेश सरकारनें ठरविलें आहे. वेधशाळेच्या उपयोगासाठी ६८,००० रुपये किंमत देऊन एक मोठी दुर्बीण खरेदी करण्यांत आली आहे. ग्रहगोलकांचा अभ्यास करण्यासाठी आणखी २ कोटी रुपयांचीं खगोलविषयक उपकरणेंहि घेण्यांत येणार आहेत.

**निझाम संस्थानांतील रेल्वे**—ग्वाल्हेर, घोलपूर आणि निझाम संस्थानांच्या मालकीच्या रेल्वे येत्या नोव्हेंबरपासून जी. आय. पी. रेल्वेंत समाविष्ट करण्यांत येणार आहेत. त्यानंतर जी. आय. पी. ची लांबी सुमारें ५,५०० मैल होईल. भारतांतील रेल्वेरस्त्यांची एकूण लांबी ३६,००० मैल आहे. रेल्वेमार्गांची ६ गटांत पुनर्घटना करण्याच्या निर्णयास अनुसरून वरील मार्ग स्वीकारण्यांत आला आहे.

**नारळासंबंधीं संशोधन**—भारताच्या प. किनाऱ्यावर नारळासंबंधीं संशोधन करणारें केंद्र नीलेश्वर येथें आहे. ह्या संशोधनकेंद्रानें दोन निरनिराळ्या जातींच्या नारळांच्या रोपांचें कलम करून एका नवीन प्रकारच्या नारळाच्या झाडाचा शोध लावला आहे. नवीन झाडाला तीन वर्षांत फळें येतात आणि त्याच्या कवटींत खोबरेंही अधिक असतें.

**हिंदुस्थान-पिल्किंग्टन ग्लास वर्क्स लि.**—ब्रिटनमधील पिल्किंग्टन ब्रदर्स लि. ह्या कारखान्याच्या साह्यानें वरील कंपनी काढण्यांत आलेली आहे. कंपनीनें सार्वजनिक विक्रीसाठी काढलेलें सर्व भांडवल खपलें असल्याचें समजतें.

**युगोस्लाव्हिआला मदत**—ब्रिटन, फ्रान्स व अमेरिका ह्या तीन सरकारांनीं युगोस्लाव्हिआला ५ कोटी डॉलर्सची मदत देण्याचें कबूल केलें आहे. स्वतंत्र जगाची सुरक्षितता टिकविण्यासाठीं मार्शल टिटो जें कार्य करीत आहे त्याला मदत म्हणून हें आर्थिक साह्य देण्यांत येत आहे.

**कान्स गवत काढण्याचा कार्यक्रम**—उत्तर प्रदेशांतील बुंदेलखंडांतील शेतीच्या जमिनींतील कान्स गवत काढण्याच्या कामांत चांगलें यश आलें आहे. आतां ह्या कामाचा व्याप वाढविण्याचें येथील राज्य सरकारनें ठरविलें आहे. झाशी जिल्ह्यांत २०,००० एकर जमिनीची नांगरट ट्रॅक्टर्सच्या साह्यानें करण्यांत आली असून आणखी ४०,००० एकर जमीन अशीच नांगरण्यांत येईल. कान्स गवत उपटण्याच्या योजनेचा खर्च अंशतः सरकार आणि अंशतः शेतकरी करणार आहेत.

**आसाम सरकार कर्ज काढणार नाहीं**—आसाम सरकार आपल्या पंचवार्षिक योजनेसाठीं कर्ज उभारणार नाहीं असें समजतें. भारतीय सरकारकडून बऱ्याच प्रमाणांत मदत मिळण्याची अपेक्षा असल्यामुळें वरील निर्णय घेण्यांत आला आहे. मिळालेली मदत अपुरी पडल्यास आसाम सरकार बाकीची रक्कम स्वतःच घालणार आहे.

**सोन्याच्या किंमतींत वाढ होणार नाहीं?**— वर्ल्ड बँक व मॉनेटरी फंडाची परिषद् गेल्या १० तारखेला सुरू झाली. परिषद भरण्यापूर्वी अमेरिका सोन्याची किंमत वाढविणार आहे अशा वार्ता पसरल्या होत्या, परंतु अमेरिकेच्या तिजोरी खात्याचे चिटणीस मि. जॉन स्नायडर ह्यांनीं असा संभव नसल्याची ग्वाही दिली.

**सहकारी लँड मॉर्टगेज बँक**— सौराष्ट्रामध्यें एक सहकारी लँड मार्टगेज बँक लवकरच काढण्यांत येणार आहे असें समजतें. ह्या बँकेचें भांडवल १० लाख रुपये असेल आणि त्यापैकीं ५ लाख रुपये सौराष्ट्राचें सरकार घालणार आहे. जमीनदारांपासून भूमिदारीचे हक्क मिळविण्यासाठी शेतकऱ्यांना कर्जें देण्याच्या हेतूनें बँकेची स्थापना करण्यांत येणार आहे.

**मैफलीवरील करमणूक कर**—संगीताच्या व नृत्याच्या कार्यक्रमावर सध्यां घेण्यांत येणारा करमणुकीचा कर रद्द करण्याचा विचार मद्रास सरकार करीत आहे असें समजतें.

**ऑस्ट्रेलिअन मधमाशांची आयात**—ऑस्ट्रेलिआंतील न्यू साऊथ वेल्स ह्या उपराज्यांतून मधमाशांच्या पोळ्यांची आयात करण्याची खटपट भारतीय सरकारतर्फे चालू आहे. ऑल इंडिआ बी कीपर्स असोसिएशनचे उपाध्यक्ष सध्या ऑस्ट्रेलिआंत संशोधन करीत आहेत. त्यांच्या प्रयत्नानें वरील खटपटीला यश येऊन वरीच पोवळीं लवकरच विमानानें भारतांत आयात केलीं जातील.

**चीनला सीलोनचें रबर**—सीलोनमधून ५,००० टन रबर घेऊन एक पोलिश बोट चीनला रवाना झाली. रबराची वाहतूक परदेशी बोटींतून करावी लागत असल्यामुळें चीनला दरवर्षी सुमारें ५० लाख रुपये भाड्यापायीं द्यावे लागतात, असा अंदाज आहे.

**भोपाळच्या नबाबाच्या मुलीची मालमत्ता**—भोपाळच्या नबाबाची मुलगी नबाबजादी अबीदा हिनें पाकिस्तानांत जाण्यापूर्वी सुमारें ७५ लाख रुपये किंमतीची मालमत्ता विकली आणि ८,८३,००० रुपये पाकिस्तानांत पाठविले असें भारतीय विधिमंडळांत सांगण्यांत आलें.

**कलकत्त्याच्या रुग्णालयाला देणगी**—कलकत्त्याच्या प्रेसिडेन्सी हॉस्पिटलला १७ लाख रुपयांची मोठी देणगी मिळाली असून प. बंगाल सरकारनें ती स्वीकारण्याचें ठरविलें आहे. सुखलाल चंदनमल करनानी ट्रस्टतर्फें शेठ इंद्रकुमार करनानी ह्यांनीं एवढी मोठी देणगी देऊं केली आहे. रुग्णालयाचें नांव राय बहादुर सुखलाल करनानी हॉस्पिटल असें ठेवण्याची अट घालण्यांत आली आहे.

**विक्री कराची माफी**—ता. १ जुलै, १९४९ अगर त्यानंतर सहकारी तत्त्वावर दुधाचा पुरवठा करणाऱ्या ज्या संस्था काढण्यांत आल्या आहेत, त्यांच्यापासून विक्रीकर न घेण्याचें मद्रास सरकारनें ठरविलें आहे. करमाफीची सवलत संस्था सुरू झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षेंपर्यंत मिळणार आहे. अशा प्रकारच्या नव्या संस्थांना आर्थिक साह्य व्हावें म्हणून करमाफी देण्यांत आली आहे.

**स्वतःची कीर्ति माहीत नसलेला खलाशी**—लाखों लोकांनी ज्याचें छायाचित्र आपल्या खिशांत बाळगलें होतें, परंतु ज्याला स्वतः त्याची कल्पनाहि नव्हती, असा एक खलाशी ब्रिटनमध्यें नुकताच मरण पावला. ह्या खलाशाचें नांव हंटले वुड असें होतें. १८९७ सालीं तो ब्रिटनच्या नाविक दलांत होता. तेव्हां एका सिगारेटच्या कंपनीला पाकिटावर छापण्यासाठी एका खलाशाचें छायाचित्र पाहिजे होते. त्यावेळीं हंटले वुड ह्याचा फोटो घेण्यांत आला. तेव्हांपासून ' नेव्ही कट ' सिगारेटच्या पाकिटावर त्याच्या प्रतिमा छापण्यांत येत आहेत.

**ऑस्ट्रेलिआला भारताचीं पोतीं हवींत**—ऑस्ट्रेलिआला भारताकडून निदान २०,००० टन वजनाच्या धान्यासाठी पोत्यांची आवश्यकता आहे. देशांत पिकणारा गहूं परदेशी पाठविता यावा म्हणून त्यांची अतिशय गरज आहे. भारताला गव्हाची जरूर असल्यामुळें उभय पक्षी व्यापार वाढविण्याची ही चांगली संधि आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

ठेवीवर १ वर्षाला ६ टक्के व्याज दिलें

म्हणून

ठेवी मिळून कार्य लवकर यशस्वी झालें.

## मिल हाऊस, पॉवर हाऊस, बॉयलर

**—: ट्रायल घेतली A1 :—**

## नवीन माशिनरीनें

**दिपवाळीनंतर साखर करण्यास सुरुवात**

येत्या हंगामापासून साखरेच्या उत्पादनांतील वाढीनें

[१] मुदतीप्रमाणें ठेवी परत करतां येतील.

[२] शेअरचा १० टक्के नफा कायम ठेवतां येईल.

## ★ शेअर–विक्री सुरू आहे ★

शेअर व ठेवींचे फॉर्म कंपनीच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

**★ ठेवीची मुदत १ वर्ष : व्याज ६ टक्के ★**

कॉमनवेल्थ बिल्डिंग, ९८०
सदाशिव पेठ, लक्ष्मीरोड, पुणें २.
दि. ९ सप्टेंबर १९५१.

**चंद्रशेखर गोविंद आगाशे,**
बी. ए., एल्‌एल्. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. १९ सप्टेंबर, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## वॉशिंग्टन येथील आंतरराष्ट्रीय चलननिधीची बैठक, हुंडणावळीचा प्रश्न व हिंदचा रुपया

सप्टेंबरच्या १० तारखेला वॉशिंग्टन येथें भरणारी आंतरराष्ट्रीय चलननिधीची बैठक महत्त्वाची आहे, कारण १९४४ सालीं स्वीकारण्यांत आलेल्या व्यवस्थेप्रमाणें पुढील वर्षाच्या मार्चपासून निरनिराळ्या देशांनीं चालू देण्याघेण्यावरील हुंडणावळीच्या व्यवस्थेवरील नियंत्रण रद्द करावें अशी योजना आहे. परंतु स्टर्लिंग गटांतील हिंद, ब्रिटन इ. देश याला विरोध करतील असा बराच संभव दिसतो. कारण, गेल्या कांहीं महिन्यांत या देशांची व स्टर्लिंग गटांतील इतर देशांची परराष्ट्रीय व्यापाराबद्दलची परिस्थिति बदलली आहे व त्यामुळें डॉलर्सची टंचाई पुन्हां जाणवूं लागली आहे. चलननिधीच्या परवानगीनेंच पुढील वर्षाच्या मार्चनंतर सभासद देशांना हुंडणावळीच्या दरावर नियंत्रण ठेवतां येईल. आंतरराष्ट्रीय चलननिधीनें हुंडणावळीचें नियंत्रण साध्य करण्यासाठीं स्वतंत्र खातें सुरू करावयाचें ठरविलें आहे. परंतु ही कल्पना निधीच्या कित्येक सभासदांना आवडणार नाहीं. निधीनें आपल्या सभासद देशांना असें कळविलें आहे कीं त्यांनीं आपल्या सुवर्ण व डॉलर सांठ्याचा उपयोग आपल्या चलनाची किंमत वाढवून घेण्यासाठीं करूं नये, तर हुंडणावळीवरील नियंत्रणें कमी करण्यासाठीं करावा. परंतु ब्रिटन इ. देशांचा या बाबतींतला विरोध लक्षांत घेउन कदाचित् आंतरराष्ट्रीय चलननिधी १९४४ सालीं स्वीकारलेलेंच धोरण मान्य करावें याबद्दल आग्रह करणार नाहीं, असाहि संभव आहे.

अलिकडे प्रसिद्ध झालेल्या आंकड्यावरून जुलै महिन्याचा हिंदचा परराष्ट्रीय व्यापार सुमारें ९ कोटी रुपयांची तूट दाखविणारा झाला. सध्यां ब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार वर्षाला १६५ कोटी पौंड तूट दाखवीत आहे. स्टर्लिंग गटांतील देशांची १९५१ च्या पहिल्या तिमाहींत डॉलर्समधली अनुकूल तफावत ३६ कोटी डॉलर्स होती ती दुसऱ्या तिमाहींत ५½ कोटी डॉलर्स आली. लोंकर व कथील यांच्या किंमती अगदीं अलिकडे बऱ्याच उतरल्या आहेत. त्याचाहि परिणाम व्यापारी परिस्थितीवर होत आहे. याचा परिणाम असा होणें संभवनीय आहे कीं, पुढील वर्षानंतरहि ब्रिटनला हुंडणावळीच्या दरावरील नियंत्रण चालू ठेवावें लागेल व याबद्दल आंतरराष्ट्रीय चलननिधीला योग्य ती कल्पना यावी लागेल.

या सर्व माहितीवरून असें दिसून येईल कीं यापुढें जागतिक व्यवहारांत हिंदच्या रुपयानें ब्रिटनच्या पौंडाप्रमाणेंच स्वत्व दाखविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हिंदच्या आर्थिक परिस्थितीच्या अनुरोधानेंच हिंदच्या रुपयाच्या हुंडणावळीच्या दरांत जरूर तो चढउतार झाला पाहिजे. असें होईल तरच जागतिक व्यापारी उलाढालींत हिंदचा रुपया मजबूत बनूं शकेल. चहा, तागाचा पक्का माल, लाख, अभ्रक, मँगॅनीज, मिरीं, कातडीं व कांहीं जातींचें कापड यांच्या पाठवणीनें हिंदचा रुपया स्वत्व राखून मजबूत बनणें शक्य आहे.

## अर्बन कोऑपरेटिव्ह बँका

### शेअर्स व डिबेंचर्समध्यें पैसे गुंतविण्यास परवानगी

विशिष्ट प्रकारच्या अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकांना स्वतःजवळील जास्त रक्कम रजिस्टर्ड कंपन्यांच्या शेअर्स व डिबेंचर्समध्यें गुंतवितां यावी म्हणून मुंबई सरकारनें १९२७च्या सहकारी संस्थांसंबंधीच्या नियमांत दुरुस्ती केली आहे.

यासाठीं २७ ( २ ) हा नवा पोट नियम बनविण्यांत आला असून तो मुंबई सरकारच्या ३० ऑगस्टच्या गॅझेटच्या भाग ४-ब मध्यें प्रसिद्ध झाला आहे. त्यानुसार खालीलपैकीं कोणत्याहि प्रकारच्या अर्बन कोऑपरेटिव्ह बँकेला स्वतःजवळची जादा रक्कम, १९१३ च्या इंडियन कंपनीज् ॲक्टाखालीं रजिस्टर्ड झालेल्या आणि बॉम्बे को-ऑपरेटिव्ह बँक्स असोसिएशन ज्यांना मान्यता देऊं शकेल अशा कोणत्याहि कंपनीच्या शेअर्स किंवा डिबेंचर्समध्यें गुंतविता येईल. ( अ ) ज्यांचे भरणा झालेलें शेअर भांडवल ५०,००० रुपयांपेक्षां व राखीव निधि ( रिझर्व्ह फंड ) ५०,००० रुपयांपेक्षां कमी नसेल अशा बँका, ( ब ) ज्या रजिस्टर होऊन १० वर्षें पूर्ण झालीं असतील अशा आणि ( क ) ज्यांना गेल्य ऑडिटच्या वेळीं अ किंवा ब श्रेणी मिळाली असेल अशा बँका

तथापि वरील प्रकारच्या शेअर्स व डिबेंचरमध्यें जी रक्कम गुंतवायची असेल ती केव्हांहि त्या त्या बँकेच्या ठेवीबाबतच्या जोखिमेच्या पांच टक्के किंवा तिच्या जवळील जास्त रकमेच्या १५ टक्के यापैकीं जी कमी असेल तितक्या रकमेपेक्षां अधिक असतां कामा नये; आणि गुंतवावयाची एकूण रक्कम (अ) प्रेफरन्स शेअर्सच्याबाबतींत बँकेजवळील एकूण जास्त रकमेच्या १० टक्क्यांपेक्षां, ( ब ) ऑर्डिनरी शेअर्सच्या बाबतींत पांच टक्क्यांपेक्षां आणि (क) डिबेंचर्सच्या बाबतींत १५ टक्क्यांपेक्षा अधिक असतां कामा नये.

अशा प्रकारें पैसे गुंतविल्यामुळें बँकेच्या सर्वसाधारण व्यवहारांवर अनिष्ट परिणाम होणार असेल तर पैसे गुंतविण्यास सदरहु पोट नियमान्वयें परवानगी दिली जाणार नाहीं.

या पोट नियमासाठीं बँकेजवळील जास्त रक्कम याचा अर्थ, जी रक्कम सभासदांना कर्जाऊ देतां येऊं शकेल परंतु ती दिली गेली नाहीं अशी रक्कम, असा आहे.

## मास्कोला भरणारी आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषद

येत्या डिसेंबर महिन्यांत मास्को येथें एक आंतरराष्ट्रीय आर्थिक परिषद भरविण्यांत येणार आहे. ही परिषद वर्ल्ड पीस कौन्सिलतर्फे बोलाविण्यांत आली आहे. परिषदेला सुमारें ८० देशांचे प्रतिनिधी हजर रहाणार आहेत. अमेरिका, रशिआ, ब्रिटन, फ्रान्स आणि चीन ह्या पांच बड्या राष्ट्रांचे प्रतिनिधीहि परिषदेच्या कामकाजांत भाग घेणार आहेत असें समजतें. कामकाजासंबंधीं प्राथमिक तयारी करण्यासाठीं निरनिराळ्या राष्ट्रांत कमिट्या बनविण्यांत आल्या आहेत. भारताच्या प्राथमिक कमिटीचें आवाहन

मुंबईचे प्रो. पी. ए. वाडिआ ह्यांनीं केलें आहे. कमिटींत इंडिअन मर्चंटस् चेंबरचे उपाध्यक्ष श्री. रतिलाल नानावटी, ऑल इंडिआ एक्सपोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष श्री. डी. एल. शहा, कामगार पुढारी श्री. एन्. एम्. जोशी, श्री. एस. ए. डांगे, इत्यादी निरनिराळ्या दृष्टिकोनाचीं माणसें आहेत. ह्या परिषदेचें वैशिष्ट्य असें आहे कीं, तींत भाग घेणारे सर्वजण धंदेवाईक, अर्थशास्त्रज्ञ अथवा अर्थशास्त्राचे प्राध्यापकच केवळ नाहींत. व्यापार–व्यवसाय व उद्योगधंदे, ह्यांचे प्रतिनिधीहि परिषदेला हजर रहाणार आहेत; शेतकऱ्यांचे प्रतिनिधी आणि तंत्रज्ञांचे प्रतिनिधीहि परिषदेंत भाग घेणार आहेत. परिषद् मॉस्कोला भरविण्यांत येत आहे; पण हा केवळ योगायोग आहे. रशिअन सरकारनें ही परिषद बोलावलेली नाहीं. सर्व प्रतिनिधींना रशिआंत प्रवेश करण्याचे परवाने रशिअन सरकारनें देऊं केले म्हणूनच केवळ ती मॉस्कोला भरत आहे. प्रतिनिधींना परवाने देतांना त्यांचीं राजकीय मतें, पूर्वीची वागणूक अगर राष्ट्रीयत्व ह्यांचा अडथळा आणण्यांत येणार नाहीं असें समजतें. परिषदेंत दोन विषयांचा प्रामुख्यानें विचार केला जाणार आहे. शांतता राखली जाईल असें गृहीत धरून विसाव्या शतकांत लोकांचें रहाणीचें मान कसें सुधारतां येईल हा एक प्रश्न; आणि निरनिराळ्या राष्ट्रांतील आर्थिक संबंध कसे सुधारतां येतील हा दुसरा प्रश्न. सध्यांच्या जागतिक परिस्थितींत आर्थिक प्रश्नांना आलेलें महत्त्व लक्षांत घेतां मास्को परिषदेंत होणाऱ्या विचारविनिमयाकडे औत्सुक्यपूर्वक लक्ष पुरविण्यांत आल्यास नवल नाहीं.

## भारतांतील औद्योगिक उत्पादनांत वाढ

### १९५१ च्या पहिल्या सहामाहींतील प्रगति

भारतांतील ५० महत्त्वाच्या उद्योगधंद्यांचें उत्पादन १९५१ च्या पहिल्या सहामाहींत वाढलें आहे. १९५० च्या पहिल्या सहामाहींत १६३ लक्ष टन कोळसा निघाला होता; १९५१ च्या पहिल्या सहामाहींत त्याचें उत्पादन १७२ लक्ष टन झालें. पोलादाच्या उत्पादनाचे तत्सम आकडे ४,७७,००० टन व ५,२५,००० टन असे आहेत. म्हणजे, गेल्या वर्षीच्या सहामाहीपेक्षा १९५१ च्या पहिल्या सहामाहींत ४८,००० टन पोलादाचें ज्यास्त उत्पादन झालें. कापडाचें उत्पादन वाढल्यामुळें जनतेस ज्यास्त कापड कसें उपलब्ध होऊं शकलें, हें खालील आकडे दर्शवितात:—

| | | | |
|---|---|---|---|
| जानेवारी | १९५१ | ६०,९८७ | गांठी |
| फेब्रुवारी | १९५१ | ११२,८९० | गांठी |
| मार्च | १९५१ | १६७,८०७ | गांठी |
| एप्रिल | १९५१ | २२०,८९६ | गांठी |
| मे | १९५१ | २४९,५२६ | गांठी |
| जून | १९५१ | २५५,५१५ | गांठी |

सुताच्या पुरवठ्यांतहि हळुहळु वाढ होत गेली आहे. १९५० मध्यें दरमहा सरासरीनें ४२,४५८ गांठी सूत उपलब्ध झालें. १९५१ मधील पहिल्या सहामाहींचे आकडे खालीं दिले आहेत:—

| | | | |
|---|---|---|---|
| जानेवारी | १९५१ | ३२,११३ | गांठी |
| फेब्रुवारी | १९५१ | ५५,२७५ | गांठी |
| मार्च | १९५१ | ५४,९३२ | गांठी |
| एप्रिल | १९५१ | ५८,४६५ | गांठी |
| मे | १९५१ | ६१,२६३ | गांठी |
| जून | १९५१ | ६१,४५२ | गांठी |

तागाच्या मालाचें उत्पादन १९५० च्या पहिल्या सहामाहींत ४ लक्ष, ३ हजार टन झालें होतें, तें १९५१ च्या पहिल्या सहामाहींत ४ लक्ष, २५ हजार टन झालें. सिमेंट, कागद, डीझेल इंजिनें, इत्यादींचेंहि उत्पादन सुधारलें.

सायकली, विजेचे दिवे, सल्फ्यूरिक ॲसिड, सिगारेट्स, कॉपर कंडक्टर्स इत्यादींच्या उत्पादनानें मात्र वाढ दाखविली नाहीं.

ज्यांचें उत्पादन वाढलें आहे, अशांचा तपशील खालीं दिला आहे:—

| उद्योगधंदा | माप | उत्पादन जाने.–जून १९५० | उत्पादन जाने.–जून १९५१ |
|---|---|---|---|
| १. कोळसा | लक्ष टन | १६२·८ | १७२·५ |
| २. पोलाद | हजार टन | ४७७ | ५२५ |
| ३. सिमेंट | लक्ष टन | १२·६ | १५·१ |
| ४. कापड | लक्ष वार | १८९९५·४ | २०१४१·६ |
| ५. सूत | लक्ष पौंड | ६०५५·६ | ६३१२·६ |
| ६. तागाचा माल | हजार टन | ४०३·२ | ४२५·७ |
| ७. कागद | हजार टन | ५२·८ | ६३·२ |
| ८. डीझेल इंजिनें | नग | १९०९ | ३३२७ |
| ९. विजेच्या मोटारी | हजार अ. श. | ३५·०९ | ६६·९ |
| १०. विजेचे ट्रॅन्सफॉर्मर्स | हजार कि. वॅ. | ८०·८ | ९९·३ |
| ११. विजेचे पंखे | हजार | १०९·८ | ११४·९ |
| १२. मोटरकार बॅटरीज | हजार | ९४·९ | ११०·९ |
| १३. ड्राय सेल्स | लक्ष | ६६०·३ | ७०४ |
| १४. कॉस्टिक सोडा | हजार टन | ५·२२ | ६·० |
| १५. सोडा ॲश | हजार टन | २३·०८ | २४·३ |
| १६. लिक्विड क्लोरीन | टन | १७६९ | २३३६ |
| १७. ब्लीचिंग पावडर | टन | १७३५ | २११५ |
| १८. बायक्रोमेटस | टन | ८७६ | १६०० |
| १९. ॲंटिमनी | टन | १४४ | २१५·५ |
| २०. प्लायवुड | लक्ष चौ. फू. | २३५ | ३७८·१ |
| २१. हातकंदील | हजार | ११८३·३ | १९७४ |
| २२. अब्रेसिव्हज | हजार रिमें | १३·६ | १७·९ |
| २३. रिफॅक्टरीज | हजार टन | ११४·९ | ११८ |
| २४. बेल्टिंग | टन | २३५ | ३२६ |
| २५. मशिन टूल्स | लक्ष रु. | ११·५ | २३·१ |
| २६. सुपर फॉस्फेटस | हजार टन | १९·८ | २४ |
| २७. ॲल्युमिनियम | टन | १६९८ | २०८३ |
| २८. टायर्स व ट्यूब्ज (सायकलींच्या) | लक्ष | ३४ | ४४·४ |
| २९. टायर्स व ट्यूब्ज (इतर) | लक्ष | ६१·३ | ८५ |
| ३०. लोकरी माल | लक्ष पौंड | ८२·५ | ८६·१ |
| ३१. आगपेट्या | हजार केसेस | २५७·७ | २९६·५ |
| ३२. इनॅमल माल | लक्ष नग | २५ | ३९ |
| ३३. शिवण्याचीं यंत्रें | नग | १४,९०० | २०,९५७ |
| ३४. साबण | हजार टन | ३२·४ | ३९·३ |
| ३५. पॉवर आल्कोहोल | लक्ष गॅलन | २४·९ | ३१·२ |
| ३६. शीट ग्लास | लक्ष चौ. फू. | ३५·४ | ५९·२ |
| ३७. तांबें | टन | २६६३ | ३३८० |
| ३८. शिसें | टन | २६८ | ४३८·५ |
| ३९. रेडिओ रिसीव्हर्स | हजार | २१·२१ | २९·९ |
| ४०. मोटारी | | | |
| गाड्या | नग | २४५९ | ५३४८ |
| ट्रक्स | नग | ४६३५ | ५५२७ |

## दि सारस्वत को. बँक लि.

वरील बँकेची सर्वांगीण प्रगति अखंड चालू आहे. बँकेच्या पटावर आतां ३,२८९ सभासद असून त्यापैकीं ५८५ स्त्रिया आहेत. बँकेचें वसूल भांडवल ४,४६,०५० रु. असून तिचें स्वतःच्या मालकीचें एकूण भांडवल सुमारें ८ लक्ष रु. झालें आहे. अहवालाचे वर्षी एकूण ठेवींच्या रकमेनें १ कोटीची मर्यादा सहजी ओलांडली असून ठेवींची रक्कम आतां १,०८,७६,१९० रु. झाली आहे. वसुलीचें येणें कर्जरकमेशीं प्रमाण इतर कित्येक बँकांत बरेंच खाली गेलें आहे, तें सारस्वत बँकेंत ९५% कायम राहिलें आहे. ९ मे, १९५१ रोजीं बँकेनें पुणें येथें सारस्वत कॉलनीमध्यें आपली उपशाखा उघडली, तिला उत्तेजनकारक पाठिंबा मिळत आहे. बँकेच्या इमारतीची मूळ किंमत १,३१,०१४ रु. आहे. तिच्या घसाऱ्याची तरतूद ५९,८९४ रु. झाली आहे. अधिक घसाऱ्याची आतां जरूरी नाहीं, असें कमिटीचें मत आहे. बँकेचा कारभार अत्यंत कार्यक्षमतेनें चालू असल्याकारणानें त्याचा फायदा भागीदारांस व कर्जदारांसहि उत्तम प्रकारें मिळत आहे आणि बँकेच्या मजबुतींत एकसारखी भर पडत आहे. बँकेचा अहवालहि नेहेमींप्रमाणें सुबक व तपशीलवार असून बँकेचा लौकिक वाढवील असाच आहे. अहवालाचे वर्षी बँकेस ५९,६९६ रु. निव्वळ नफा झाला. भागीदारांस नेहेमींप्रमाणें ६¼% डिव्हिडंड मिळणार आहे. ( चेअरमन : व्ही. पी. वर्दे. सेक्रेटरी : एस. व्ही. संझगिरी. वार्षिक सभा : २२–९–५१ )

---

## हिमाचल प्रदेशांतील लोकरीचें उत्पादन

हिमाचल प्रदेशांतील मेंढ्यांची एकूण संख्या सुमारें ४,९०,२९२ आहे. ह्या मेंढ्यांपासून दरवर्षी सुमारें ९,८०,५८४ पौंड लोकर मिळूं शकते असा अंदाज करण्यांत आला आहे. एकूण उत्पादनापैकीं ७,३५,४३८ पौंड लोकर प्रांतांतच वापरली जात आणि बाकीची २,४५,१४६ पौंड जवळच्या प्रांतांत निर्यात केली जाते. हिमाचल प्रदेशांत प. तिबेटमधून २,४०,००० पौंड लोकर दरवर्षी आयात केली जाते. हिमाचल प्रदेश आणि तिबेट ह्यांच्या दरम्यान सुमारें १५० मैलांची सरहद्द असल्यामुळें आयात करणें शक्य होतें. तिबेटच्या लोकरीपैकीं २,००,००० पौंड लोकर प्रांतांत वापरली जाते आणि ४,२०,००० पौंड शेजारच्या प्रांतांना पाठविण्यांत येते. प्रांतांत लोकरीच्या तीन बाजारपेठा आहेत. रामपूर, चांबा आणि मंडी ह्या ठिकाणीं लोकरीचा बाजार भरतो. पैकीं रामपूर हें गांव सिमल्यापासून ७२ मैलांवर तिबेटला जाणाऱ्या मार्गावर आहे. ह्याच ठिकाणाहून तिबेटच्या लोकरीचा प्रसार प्रांतांतील बाजारपेठांतून होतो. नोव्हेंबरच्या पहिल्या पंधरवड्यांत रामपूरला मोठी जत्रा भरते त्यावेळीं लोकरीचे सौदे करण्यांत येतात. तिबेटचे व्यापारी ह्या जत्रेला येतात; आणि येतांना आपल्या बरोबर लोकरीचे गठ्ठे अगर दोरखंडें घेऊन येतात. ही सर्व वाहतूक मुख्यतः मेंढ्यांच्या पाठीवरूनच करण्यांत येते. परत जातांना हे व्यापारी लोकरीच्या बदला घेतलेल्या हिंदी बनावटीच्या वस्तू घेऊन जातात. इतर वस्तू देऊनहि ते हिंदी माल घेतात. खुद्द रामपूरला लोकरीची किंमत पौंडामागें २।ते २॥ रुपायांपर्यंत असते. वस्तूंच्या देवघेवींतून पैसा हें विनिमयाचें साधन उत्पन्न झालें असें अर्थशास्त्राचा इतिहास सांगतो. ज्या मानानें अधिक वस्तूंच्या विनिमयाची शक्यता व जरूर असते त्या मानानें पैशाचा उगम लवकर अगर उशिरा होतो. तथापि विनिमयाचें प्राथमिक स्वरूप कसें असतें, तें रामपूरच्या जत्रेंत दिसून येतें ह्यांत शंका नाहीं.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)

शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.

दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची बचत योजना. व्याज ३ ते ३½ टक्के.
हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.


## शेतजमिनीच्या आकारमानाचें पत्रक

काहीं राज्यांतील शेतजमिनीची आकारमानानुसार वांटणी

| | मुंबई | मद्रास | पंजाब | उत्तर प्रदेश | बंगाल | बिहार | आसाम | ओरिसा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शेतजमिनीच्या आकारमानाची सरासरी (एकर) | १३·३ | ४·५ | १०·० | २·५ | ४·४ | ६·२ | ४·८ | ४·९ |
| शेतजमिनीच्या एकूण क्षेत्रफळाशीं शेकडा प्रमाण | | | | | | | | |
| (१) ५ एकरां-खालील | ४१·९ | ८२ | ६३·७ | ८१·२ | ७१·३ | ६५·९ | ६६·४ | ७९·२ |
| (२) १० एकरां-खालील | ६०·९ | ८९ | ८० | ९३·९ | ८८·३ | ८६·७ | ८७·४ | ८९·५ |
| (३) १५ एकरां-खालील | ७२·५ | — | ७७·९ | — | — | — | — | ९४·३ |
| (४) २५ एकरां-खालील | ८५·२ | — | ९३·७ | ९९·१ | — | — | — | ९७·८ |

---

## ज्ञानेश्वर त्रैमासिक

वरील त्रैमासिकाचा ४ थ्या वर्षाचा १ ला अंक श्री ज्ञानेश्वर महाराजांच्या ६७७ व्या जन्मदिनीं, २४ ऑगस्ट रोजीं प्रसिद्ध झाला आहे. याज्ञवल्क्य आश्रम, पुणें, ह्या संस्थेचें हें प्रकाशन व मुखपत्र असलें तरी संस्थेच्या विविध शाखांच्या कामाचा परामर्ष घेण्याइतकें मर्यादित स्वरूप त्याचें नसून, विद्वानांचे व्यापक सांस्कृतिक लेख त्यांत प्रसिद्ध होत असतात. त्यामुळें त्यानें मराठी नियतकालिकांत वैशिष्टयपूर्ण स्थान प्राप्त करून घेतलें आहे. त्याचें श्रेय प्रकाशन मंडळास व संपादक श्री. वि. त्र्यं. शेटे, बी. ए., एलएल. बी. ह्यांसच दिलें पाहिजे. वा. व. ३ रु. आहे.

---

## भारत ११ लक्ष गांठी कपास बाहेरून आणणार

येत्या वर्षी भारत ११ लक्ष गांठी कपास आयात करील. त्यापैकीं ६ लक्ष गांठी अमेरिकेंतून येतील. पाकिस्तानी कपास महाग पडत असल्यानें ती वापरणें हिंदी गिरण्यांना किफायतशीर होणार नाहीं.

---

## युनायटेड नेशन्सच्या वर्गणींत वाढ

युनायटेड नेशन्सच्या खर्चासाठी पुढील वर्षी भारत, पाकिस्तान आणि रशिया ह्यांनीं ज्यास्त वर्गणी द्यावी व अमेरिका आणि ब्रिटन ह्यांची वर्गणी कमी करण्यांत यावी, असें यु. ने. च्या कमिटीनें सुचविलें आहे. त्याप्रमाणें, भारताच्या वार्षिक वर्गणींत ५०,१०० डॉलर्सची वाढ होईल. ब्रिटन व रशिया ह्यांची वर्गणी अनुक्रमें ३,३०,५०० व ८,२३,००० डॉलर्सनीं कमी होईल.

( मिरज येथें १९१९ सालीं स्थापन झालेली भागीदारांची जबाबदारी मर्यादित )

## दि मिरज स्टेट बँक लि.

—मिरज—

शेड्यूल्ड बँक

( स्थापना : १९१९ )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल ... | रु. १५,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें ... | रु. ११,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड ... | रु. ५,७०,००० |
| एकूण खेळतें भांडवल ... | रु. ७०,००,००० |

शाखा

★ लक्ष्मेश्वर ( जि. धारवाड )

★ कुर्डूवाडी, पंढरपूर व अकलूज ( पे ऑफिस )

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. सरकारी रोखे, शेअर्स, सोनें, माल, स्थावर मिळकत वगैरेचे तारणावर कर्ज अगर कॅश क्रेडिट दिलें जातें. समक्ष चौकशी बँकेकडे करावी अगर लिहावें.

डॉ. कृ. गो. गोसावी, चेअरमन. के. डी. शिराळकर मॅनेजर

## दक्षिण सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक

—लि., सांगली.—

स्थापना १९२७

मुख्य कचेरी : हायस्कूल रोड, सांगली

तारेचा पत्ता RAYAT BANK फोन नं. ३०

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. | २,४९,२०० |
| वसूल झालेलें भांडवल | रु. | २,१०,५९० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १,४३,०९७ |
| खेळतें भांडवल | रु. | १७,००,००० चे वर. |

शाखा

(१) जत (२) मिरज (३) तासगांव

बँकेची ज्युबिली १९५२ सालांत आहे.

बँकिंगचे इतर सर्व व्यवहार केले जातात.

रा. बा. आरवाडे, B. A., LL. B. चेअरमन    ना. पां. ठाणेदार, मॅनेजर

## पुणें जिल्हा सहकारी खरेदी विक्री संघ लि.

४१२ शनवार पेठ, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनकोसोप. -टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वाटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या नियमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वाटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

संस्थेच्या अडत दुकानाचा पत्ता व टेलिफोन नं. ३२०५. } ११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

## बँक ऑफ पूना, लिमिटेड.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. २५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. १२,५०,००० |

— संचालक मंडळ —

१ श्री. मुरलीधर चतुरभुज लोया, ( चेअरमन )
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी., व्हा. चेअरमन.
३ डॉ. ना. भि. परुळेकर, संचालक 'सकाळ'
४ श्री. फ्रामजी पेस्तनजी पोचा, सीड्स् मर्चंट
५ श्री. लक्ष्मीनारायण रामचंद्र राठी, बँकर्स व मर्चंट सोलापूर
६ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी, व्यापारी
७ श्री. गणपतराव काळूराम नाईक, बी. एस्सी., बी. ई., एलएल. बी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत मौल्यवान जिनसा सुरक्षित ठेवण्याची सोय.

ठेवींवर व्याज—

चालू खातें अर्धा टक्का, सेव्हिंग्ज १॥ टक्के,
मुदत ठेव १ वर्ष २॥ टक्के, २ वर्षें ३ टक्के.

शाखा स्थानिक—(१) भवानी पेठ, व (२) सदाशिव पेठ, पुणें.
बाहेरगांवीं—सोलापूर, सांगली.
मुख्य ऑफिस:—४५५ रविवार पेठ, पुणें नं. २

गो. गं. साठे. मॅनेजर.

## अहवालांचा साभार स्वीकार

१ चाळिसगांव पीपल्स को. बँक लि. ( चेअरमन : कन्हैयालाल सखाराम खार्वीया. मॅनेजर : ए. डी. पाटील. वार्षिक सभा : ९-९-५१).

२ विटा मर्चंटस को. बँक लि. ( चेअरमन : वा. गो नर्वे, बी. ए., एलएल. बी., मॅनेजर : जी. आर. अम्हनाळकर, एलएल. बी. वार्षिक सभा : २६-८-१९५१ ).

३ अर्बन को. बँक लि. सांगली. ( चेअरमन : गणेश कोंडो गोडबोले, बी. ए., एलएल. बी. व्यवस्थापक : लक्ष्मण यशवंत लागू, बी. ए., एलएल. बी. वार्षिक सभा : २६-८-५१ )

४ बॉंबे प्रॉ. को. लँड मॉर्गेज बँक लि. ( चेअरमन : नगिनदास टी. मास्टर. मॅनेजर : बी. एन. देसाई. वार्षिक सभा : २८-९-५१ )

५ बार्शी सें. को. बँक लि. ( चेअरमन : रामचंद्र गोविंद परंडकर. ॲ. मॅनेजर : विश्वनाथ एकनाथ रेडे. वार्षिक सभा : ३०-९-५१ )

६ कराड अर्बन को. बँक लि. ( चेअरमन : पुरुषोत्तम पांडुरंग गोखले. मॅनेजिंग डायरेक्टर : शंकर पुरुषोत्तम कुलकर्णी वार्षिक सभा : १६-९-५१ ).

७ भुसावळ पीपल्स को. बँक लि. ( चेअरमन : हरी सदाशिव खरे, वकील, मॅनेजर : जिनाभाई जी. देसाई. वार्षिक सभा : २३-९-५१ ).

## चित्रतारकेची प्राप्ति—नफा, कीं पगार ?

( मुंबई हायकोर्टाचा निवाडा )

श्री. दुर्गा खोटे ह्यांचें मार्च, १९४५ अखेरचें उत्पन्न इनकम टॅक्स कायद्याच्या सातव्या कलमानुसार ( ज्यांत पगाराची प्राप्ति ठरविण्याची पद्धत सांगितली आहे ) ८ हजार रुपये कपडे आणि वहातुक खर्च ह्यासाठीं वजा घालून १,२१,७४८ रु. धरण्यांत आलें. दुर्गाबाईनीं अपील केलें, तेव्हां अपेलेट असिस्टंट कमिशनरनें " दहाव्या कलमाप्रमाणें ( ज्यांत धंदा, व्यवसाय, ह्यांची प्राप्ति ठरविण्याची पद्धत सांगितली आहे ) त्यांची प्राप्ति ठरविण्यांत यावयास पाहिजे होती " असा निर्णय दिला आणि खर्चासाठी आणखी ४,५०० रु. ची सूट दिली. खात्यानें अपील केलें, तेव्हां इन्कम टॅक्स ट्रायब्यूनलनें " १० व्या कलमाप्रमाणेंच प्राप्ति ठरविली पाहिजे " हें अपेलेट असिस्टंट कमिशनरचें म्हणणें उचलून धरलें, तेव्हां खात्यानें हायकोर्टाकडे अपील केलं. हायकोर्टानेंहि १० वें कलमच लागू ठरविलें. " ज्या प्राप्तीचे पद्धतींत एका ठराविक जागीं काम नसतें, परंतु एकामागून एक अशीं अनेक वेगवेगळीं कामें असतात व त्यासाठीं इकडून तिकडे जावें लागतें, त्या पद्धतींत प्रत्येक काम स्वतंत्र नोकरी न मानतां, प्रत्येक तात्पुरतें कामच मानलें पाहिजे " असा हायकोर्टाचा अभिप्राय पडला.

### " ब्रिटिश बँकेंतील ठेवी काढून घ्या "

" इराणमधील ब्रिटिश बँकेंतून सर्व इराणी ठेवीदारांनीं आपले पैसे २० सप्टेंबरपूर्वी काढून घ्यावेत, कारण ही बँक म्हणजे अँग्लो इराणिअन ऑईल कंपनीची एक छोटी आवृत्तीच असून ती इराणच्या हितसंबंधास बाधक आहे. " असा आदेश इराणमधील एका नेत्यानें तेथील जनतेस दिला आहे.

### लोकमान्य इंडस्ट्रीज लि., पुणें

कंपनीच्या कारखान्याचा प्रायोगिक काल आतां संपला असून प्रत्यक्ष उत्पादनास व विक्रीस प्रारंभ झाला आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, गुजरात, मद्रास, इत्यादि ठिकाणीं कारखान्याच्या शाईचा प्रसार झाला आहे. ३१ मार्च, १९५१ अखेर संपलेल्या वर्षी कंपनीनें १४,१६४ रु. ची विक्री करून २,९४८ रु. ठोक नफा मिळविला. परंतु इतर सर्व खर्चाचा बोजा ह्या उत्पादनावर पडल्यानें निव्वळ तोटा ११,१८९ रु. आला, तो डिफर्ड रेव्हेन्यू खर्चांत आतां मिळविण्यांत आला आहे. कंपनीचें वसूल भांडवल ६२,१३४ रु. वरून ७०,९१० रु. वर गेलें आहे. कारखान्याच्या शाईचें उत्पादन व खप वाढविण्याचा मॅनेजिंग एजंटांचा कसून प्रयत्न चालू आहे, आणि त्यांत यश मिळेल असा विश्वास आहे. ( चेअरमन : रा. ब. जी. जी. शेंबेकर. मॅ. एजंटस : मे डब्ल्यू. एन. कलंत्रे आणि कं. वार्षिक सभा : ३०-९-५१ ).

सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि. कऱ्हाड व सांगली,

## भागीदारांस नोटीस

बँकेच्या भागीदारांची १६ वी वार्षिक साधारण सभा रविवार ता. ३० सप्टेंबर १९५१ रोजीं दुपारीं ३ वाजतां सांगली येथें अॅग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमेटी, सांगली यांचे ऑफिस-मध्यें भरणार आहे. त्यावेळीं बँकेचा सन १९५०-५१ चा अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, सन १९५१-५२ सालचें बजेट मंजूर करणें, नियमाप्रमाणें डायरेक्टर्स यांची झालेली निवड जाहीर करणें, तपासणी यादीचा विचार करणें वगैरे कामें केलीं जातील. तरी सर्व सभासदांनीं येणेचें करावें अशी विनंति आहे. कळावें.

कराड, ९।९।५१ आ. ना. कल्याणी
चेअरमन

श्री लक्ष्मी सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक, लि., फलटण

## प्रकट सूचना

बँकेची पंचविसावी वार्षिक साधारण सभा रविवार, दि. ३० सप्टेंबर १९५१ या दिवशीं सायंकाळीं ५ वाजतां फलटण येथें बँकेच्या कचेरीमधील दिवाणखान्यांत भरणार आहे. सभेंत खालिल कामें करण्यांत येतीलः—

(१) दि. ३०-९-१९५० च्या वार्षिक सभेचा व दि. १९-८-१९५१ च्या विशेष सा. सभेचा वृत्तांत कायम करणें; (२) बँकेचे व. सरकारी हिशेबतपासनीस यांच्या तपासणी यादींचा विचार करणें, (३) दि. ३०-६-१९५१ ला संपलेल्या वर्षाबद्दल प्रतिवृत्त व ताळेबंद आणि नफा-वांटणीची शिफारस, (४) भागीदारांना वाटावयाचा नफा, (५) नेमून दिलेल्या संचालकांचीं नांवें प्रकट करणें; (६) पुढील वर्षाकरितां बँकेचा हिशेब तपासनीस नेमणें व त्याचें वेतन ठरविणें, (७) चालू वर्षांत बँकेनें घ्यावयाची जबाबदारी ठरविणें; (८) आयत्या वेळचीं कामें.

सर्व भागिदारांनीं सभेस अगत्य यावें अशी विनंति आहे.

फलटण, संचालक मंडळाचे आज्ञेवरून,
ता. ११-९-१९५१ श्री. ह. तळवलकर,
व्यवस्थापक.

## इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडिया

३० जून, १९५१ रोजीं व तुलनेसाठीं ३० जून, १९५० रोजीं कॉर्पोरेशनच्या भागदारांचें वर्गीकरण कसें होतें, हें खालील तक्ता स्पष्ट करील:—

**भागांचें वर्गीकरण**

| | भागांची संख्या 30—६—५१ | भागांची संख्या ३०—६—५० |
|---|---|---|
| मध्यवर्ती सरकार | २,००० | २,००० |
| रिझर्व्ह बँक | २,०५४ | २,०५५ |
| शेड्यूल्ड बँका | २,४७५ | २,४८० |
| विमा कं., इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्स, इ. | २,५२८ | २,५२३ |
| सहकारी बँका | ९४३ | ९४२ |

**अर्जांची विल्हेवाट**

| | ३०-६-५१ अखेरचें वर्ष | ३०-६-५० अखेरचें वर्ष | ३०-६-४९ अखेरचें वर्ष |
|---|---|---|---|
| आलेले अर्ज (लक्ष रु.) | ५४७ | ८७५ | १०३३ |
| मंजूर अर्ज (लक्ष रु.) | २३९ | ३७७ | ३४२ |
| नामंजूर अर्ज (लक्ष रु.) | १६५ | ४३० | १८८ |


**कर्जांची राज्यवार वाटणी (रुपये)**

| | १—७—५० ते ३०—६—५१ | १—७—४८ ते ३०—६—५१ |
|---|---|---|
| आसाम | — | — |
| मुंबई | १,०३,५०,००० | ३,३२,५०,००० |
| बिहार | — | ६७,५०,००० |
| मध्यप्रदेश | — | २०,००,००० |
| दिल्ली, अजमीर-मारवाड इ. | — | — |
| पंजाब | ५,००,००० | २०,००,००० |
| मद्रास | ७,५०,००० | ८६,५०,००० |
| ओरिसा | — | ५९,००,००० |
| सं. प्रांत | १,४५,००० | ५४,२०,००० |
| प. बंगाल | १८,००,००० | १,८५,००,००० |
| राजस्थान | — | ३०,००,००० |
| सौराष्ट्र | १,००,००,००० | १,००,००,००० |
| मध्यभारत | ३,५०,००० | ३,५०,००० |
| एकूण रु. | २,३८,९५,००० (१७ अर्ज) | ९,५८,२०,००० (६१अर्ज) |

**कर्जांची रक्कमवार वाटणी**

**( ३०—६—५१ रोजींची परिस्थिति )**

| | अर्ज | रक्कम (रु.) |
|---|---|---|
| १० लाखांवरील कर्जें | ३३ | १,८८,७०,००० |
| २० ते ३० लक्ष | १३ | २,०१,००,९०० |
| २० ते ३० लक्ष | ७ | १,९५,००,००० |
| ३० ते ४० लक्ष | २ | ८०,००,००० |
| ४० ते ५० लक्ष | ६ | २,९३,००,००० |
| एकूण | ६१ | ९,५८,२०,००० |




**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,
१७२, गिरगांव रोड, मुंबई ४
टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay

**दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.**

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा:

ब्रँच सेक्रेटरी.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.